# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०५.११.२०२६ गुरूवार

(कामगिरी)

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०४.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून एकुण ७,३४,७२०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये १३ केसेसमध्ये ३३ ईसमांवर कारवाई करून एकुण ५२,२९०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे, रात्रगस्तीमध्ये दिनांक ०४.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०५.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, कलम १३५ म.पो.का. संशयीत ०२ इसमांवर कारवाई करण्यात आली.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३२ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये १२४ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ३०६ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १०५ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३४ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०९ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १३० केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०४ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २२ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ११ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,०५३ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये ०८ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,०७२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ५,८९,६५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी :–**

दिनांक १६.१०.२०२६ चे १२.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत राहणाऱ्या ४० वर्षीय फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही राहते घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तीचा शोध घेतला असता, ती मिळुन आली नाही. तीचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तीला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना माहीती मिळाली की, नमुद बेपत्ता मुलगी ही बोदुंदा पोस्ट खारा, तह. किरणापूर जि. बालाघाट, (म.प्र.) येथे

तिचे परिचीताचे घरी राहत आहे. अशा माहीतीवरून तेथे जावुन, पाहणी केली असता, नमुद मुलगी दिसुन आली. तीला ताब्यात घेवुन, तीची सविस्तर विचारपूस केली. मुलीचे समुपदेशन करण्यात आले. मुलीला पुढील कारवाईस्तव एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व त्यांचे पथकातील अधिकारी अंमलदार यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाठोडा :– हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०५.११.२०२६ चे ००.१० वा. चे सुमारास, वाठोडा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, एक हद्दपार इसम नामे अतुल मुंगसे हा जुनी वस्ती खरबी येथील मोकळे मैदानात बसून आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावून पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचा इसम दिसून आला. वाठोडा पोलीस त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळुन जाण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अतुल गोपालराव मुंगसे, वय २७ वर्षे रा. खरबी चामट हॉल, दुर्गामाता मंदीर, पाण्याचे टाकीजवळ, जुनी वस्ती, वाठोडा, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ४६६६/२०२५ दिनांक १५.१०.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. अनुप तायवाडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे पोउपनि. संजय आठवले यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो. का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.११.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, फिर्यादीची आई सौ. चंद्रकला रामदयाल रोडे, वय ६१ वर्षे, रा. प्लॉट नं. ४०, राधानगर, नरसाळा रोड, दिघोरी हया स्टेट बॅक ऑफ इंडीया, रेल्वे स्टेशन शाखा येथे

पी.एफ चौकशी करीता जात असता, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, फ्रिडम पार्क चौक येथे एका आयसर ट्रक क्र. एम.एच ४० एन ४४४९ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, पायी जाणाऱ्या फिर्यादीचे आईस धडक देवुन, घटनास्थळावरून पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीच्या आई गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अमोल रामदयाल रोडे, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट नं. ४०, राधानगर, नरसाळा रोड, दिघोरी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आयशर ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१), १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ट्रकचालक आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :–** दिनांक ०५.११.२०२६ चे ००.१० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, उंटखाना कन्हान–कामठी रेल्वेट्रॅक अपलाईनचे बाजूला, रेल्वे पोल क्र. १११३/३७ ते १११४/०१ दरम्यान एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे वयाचे, यांना रेल्वे ची धडक लागुन ते गंभीर जखमी व बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. जखमी यांना उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी हनुमंत नकाते यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नविन कामठी :–** दिनांक ०४.११.२०२६ रोजी फिर्यादीचा भाऊ नामे कुणाल मुकुंदराव वाघ, वय ३६ वर्षे, रा. भवानी नगर, राममंदीर जवळ, पारडी, नागपूर हे खाजगी कामानिमित्त घराबाहेर गेले असता, ते पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, घोरपड गावाजवळील पाण्याचे नहरचे पाण्यात बुडालेल्या मृत अवस्थेत मिळून आले. पोलीसांनी फायरब्रिगेड टीमचे सहाय्याने त्यांचे प्रेत पाण्याबाहेर काढुन उत्तरीय तपासणीकरीता उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे पाठविण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी रोशन मुकुंदराव वाघ, वय ४० वर्षे, रा. भवानी नगर, राममंदीर जवळ, पारडी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. सतिश पवार ९८३४०६९८८१ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**१) पोलीस ठाणे सिताबर्डी :–** फिर्यादी श्री. सुखराम श्रवण ठाकरे, वय ५५ वर्षे, रा. ठाणेगाव, तह. वाराशिवणी, जि. बालाघाट, मध्यप्रदेश यांनी पोलीस ठाणे सिताबर्डी येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे राकेश सुखराम ठाकरे, वय २८ वर्षे हा दिनांक १७.१०.२०२६ चे १७.०० वा. रोजी गावी जाण्यासाठी पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत एम.पि. बसस्टॉप येथे आला असता, तेथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. तो घरी परत न आल्याने, त्याचा शोध घेतला असता, तो मिळुन आला नाही. तो बेपत्ता असल्याचा फायदा घेवुन, त्याला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट १ इंच, केस–काळे, अंगात– काळा शर्ट व निळा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी/छत्तीसगढी बोलतो.

**२) पोलीस ठाणे पारडी :–** फिर्यादी श्री. सुमित प्रमोद पाटील, वय २४ वर्षे, रा. भवानी हॉस्पीटल, महाकाळकर लॉन जवळ, पारडी, नागपूर यांनी पोलीस ठाणे पारडी येथे तक्रार दिली की, त्यांचा भाऊ नामे बादल प्रमोद पाटील, वय २७ वर्षे हा दिनांक ११.०६.२०२६ चे ११.०० वा. रोजी बाहेर राज्यात कामासाठी जातो असे म्हणून राहते घरून निघून गेला. तो घरी परत न आल्याने, त्याचा शोध घेतला असता, तो मिळुन आला नाही. तो बेपत्ता असल्याचा फायदा घेवुन, त्याला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पारडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–गोरा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची–६ फुट, केस–काळे, अंगात– गुलाबी टि–शर्ट व निळा पॅन्ट व गळ्यात काळा दोरा घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतो.


राकेश


बादल

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. अतिरिक्त न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००२५५/२००६ | कलम ३८० भा.दं.वि. | मुकेश उर्फ बंटी छोटेलाल शाहु, पारडी, जयदुर्गा नगर, कळमना, नागपूर | १७.११.२०२६ |
| २. | मा. अतिरिक्त न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०५०३१३/२००० | कलम ४५७, ३८०, ३८१, २०१ भा.दं.वि. | विजय दौलतराव भोयर, सुभाष नगर, प्लॉट नं. ४२४/अ, नारायण नागमोते चे घरी किरायाने, कळमना, नागपूर | १७.११.२०२६ |
| ३. | मा. अतिरिक्त न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३००२५३/२००६ | कलम ३८०, ४५४, ४५७ भा.दं.वि. | मुकेश उर्फ बंटी छोटेलाल शाहु, पारडी, जयदुर्गा नगर, कळमना, नागपूर | १७.११.२०२६ |
| ४. | मा. २०वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०७/२०१८ | कलम ४६१, ३८० भा.दं.वि. | निलेश दिलीपराव पोटफोडे, वय २६ वर्षे, रा. रामभुमी सोसायटी, लाल शाळेमागे, भांडेवाडी, पारडी, नागपूर | २५.११.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**